# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## "बां ध का मा चा प र वा ना"

## COMMENCEMENT CERTIFICATE

बुक नंबर :- 242 अ.क्र. 6045

परवाना क्रमांक : 1021 / २०14-15

फाईल क्रमांक : 332 / १७ / २०14-15 दिनांक 13 / 02 / २०15

परवाना धारण करणाऱ्याचे नांव :- ~~श्रीमती~~ / श्री. एम. ए. मझरूद्दीन.

न.भू.क्र. / सर्व्हे क्र. / गट क्र. 17352/2 भू.क्र. मोहल्ला :- अमानपुरा औरंगाबाद

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरून खालीलप्रमाणे बांधकामाची/दुरूस्तीची परवानगी दिली जाते, सदरील परवान्याचा अंमल आज तारखेपासून **एक** वर्षापर्यंत राहील. बांधकाम पूर्ण झाल्या बाबत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी नगर रचनाकार यांनी **लाल** रंगाने दुरूस्ती/मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटीवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुषंगाने दिला जात आहे. या मध्ये नमुद केलेल्या भुखंडासंबंधी कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधात बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी/वाद न्यायालयामार्फत परस्पर दूर करून घ्याव्यात या संबंधाने उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी नगर भूमापन अधिकारी/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या मार्फत भूखंड आखणी करून घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. सदर भूखंडास/मिळकतीस मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराचा आदेश क्र. — दिनांक / /२० नुसार प्राप्त आहे.

०५. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेवू नये याबाबत दिनांक 14/01/२०15 रोजी दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

०६. या कार्यालयाचे संबंधित अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता त्याचे अवलोकनार्थ मंजूरीचे संबंधीत कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्या पर्यंत **(Piinth Level)** चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे व **Piinth Level Comletion** प्रमाणपत्र कार्यालयातर्फे घेणे आवश्यक आहे.

०८. मंजूर बांधकाम नकाशाच्या विरूद्ध जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरूद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम-४३ सह ५२, कलम-५४, कलम-५३ प्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पुर्ण झाल्या नंतर **भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)** घेण्यात यावे व त्या नंतरच इमारतीचा वापर सुरू करावा नसता आपल्या विरूद्ध म.प्रा.नि.व.न.र.अधि १९६६ चे कलम -५३ अन्वये पूढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका परवानाधारक प्लंबरने जलनि:सारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करून विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोशकुप) तयार करून त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. शहर विकास निधी रक्कम रू. 5,93,550/- च.क्र. 22781 दिनांक 27/12/२०14 नुसार जमा केली आहे.

१३. प्रिमियम रक्कम रू. 655800/- च.क्र. 22782 दिनांक 27/12/२०14 नुसार जमा केली आहे.

१४. ~~विकास खर्च निधी~~ रक्कम रू. 5,02,290/- च.क्र. 22783 दिनांक 27/12/२०14 नुसार जमा केली आहे.

१५. ~~अतिरिक्त विकास शुल्क~~ रक्कम रू. 1,11,800/- च.क्र. 23330 दिनांक 14/01/२०15 नुसार जमा केली आहे.

१६. भोगवटा प्रमाणपत्र घेणे पूर्वी समासातील अंतरामध्ये कमीत कमी ( 18 ) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१७. जागेवरील झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणा मार्फत परवानगी घेण्यात यावी.

१८. जागेवर विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून काढून घ्यावी नंतरच बांधकाम सुरू करावे.

१९. भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वी / ~~जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी~~ स्वतंत्र पी.आर.कार्ड / ~~एकत्रित पी.आर.कार्ड व~~ टोच नकाशा सादर करावा.

२०. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही, जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी आपणास पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तरी पाणी पुरवठा बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

२१. ~~40.00मी. विधी रस्त्याने बाधीत क्षेत्र 109.63m² R-D.C.O. क्र 5861-2015~~

२२. ~~दि.22/01/2015 करून मनपा हक्काने हस्तांतर केले आहे.~~ तरी सदर भूखंडाच्या पूर्वी बोप क्र. 804/90 दि. 01/11/90 अन्वये देण्यात आलेली होती.

23) उर्व शहर विकास निधी रु. 11,200/- च.क्र. 23329 दि. 14/01/15 रोजी जमा केली आहे.

24) ओ.प्र. घेणेपूर्वी बाधीत क्षेत्राचे मनपाचे नावे पि. आर कार्ड सादर करावे.

तजवीज दिनांक : 26/12/२०14

आयुक्त 12/2/15

औरंगाबाद महानगरपालिका,

यांचे करीता.

O. C. Signed by A.D.T.P.

प्रतिलिपी, :-०१ मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

०२ प्रशासकीय अधिकारी विभाग क्रमांक अ, ~~ब, क, ड, ई, व फ~~ यांना माहितीस्तव योग्य कार्यवाहीस्तव दिली जाते.

(3) जरीO1

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद नगर रचना विभाग